Vol III Issue X July 2014

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.net**

Review Of Research
Vol. 3 | Issue. 10 | July. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# कॅप्टन जॉन ब्रिग्ज आणि धुळयाचा विकास

*एन. एस. पाटील*

विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळे.

***सारांश :***

धुळे गावाची वस्ती केव्हा झाली हे निश्चित सांगता येत नाही आणि तसा पुरावा ही काही सापडत नाही. परंतु एकंदर जो पुरावा सापडतो. त्यावरून धुळे गांव 1251 वर्षापुर्वी वसले असल्याचा निश्चित पुरावा मिळतो. धुळे शहराच्या ऐतिहासीक वृतांत साधरणतः इ.स. 753 राष्ट्कुटाची राजवट खान्देशाच्या भागावर असल्याचे दिसुन येते. कारण या वंशाचे धुळे, तोरखेडे, खर्दे, तळोदे, जवखेडे, पिंपरी इ. ठिकाणी ताम्रपट सापडले आहेत. राष्ट्रकुटाची राजवट सुमारे 220 वर्षे या भागात होती. त्यानंतर यादव आणि अल्लाउद्दीन खिलजी यांची सन 1370 पर्यंत सत्ता होती. इ.स. 1370 मध्ये दिल्लीच्या सुलतान फिरोज तुघलक याने मलिक राजा फारुकी नावांच्या अरब तरुणांस थाळनेर आणि करवंद असे दोन सुभे बक्षिस दिले. त्यात धुळे गांव त्याच्या अधिपत्याखाली होते. त्याच वेळी देवपूर आणि जुने धुळे येथे दोन गढया बांधण्यात आल्या देवपूर येथील गढी इ.स. 1872 साली पांझरा नदीस आलेल्या महापूराने वाहून गेली. इ.स. 1600 पावेतो फारुकी राजाचा अंमल होता.

***प्रास्ताविक :***

अकबर बादशहाच्या कारकिर्दीत खान्देश मोगलाचे अधिपत्याखाली आला. इ.स. 1629–30 साली लढाई आणि दुष्काळ या दोन्ही संकटात हा भाग सापडला होता. दक्षिणेचा सुभेदार खान शहाजहान लोधी हा बंड करुन उठल्यामुळे त्याचा पाडाव करण्यासाठी स्वतः शहाजहान दक्षिणेत आला असताना ब–हाणपुर येथे त्याचा मुक्काम होता. त्यावेळी खाजा महमद हसन यांच्या अधिपत्याखाली 8000 घोडे स्वाराची पलटन देउन त्यास खान्देश भागात पाठविले. त्यावेळी पावसाचे चार महिने धुळे गांवाचे जवळ त्यांने आपला तळ दिला होता.

इ.स. 1752 सालात मराठयांनी मोगलांचा पूर्णपणे पाडाव केल्यानंतर सन 1818 पर्यंत या भागावर मराठयांची अबाधित सत्ता होती. परंतु सन 1752 ते 1803 पावेतो धुळे गावांच्या ऐतिहासीक दृष्टया कोठेही फारसा उल्लेख सापडत नाही. इ.स. 1770 ते 1818 पावेतो होळकर आणि शिंदे यांच्या आपसातील भांडणामुळे खान्देशात अस्वस्थता होती. तसेच होळकर, शिंदे पेशवे यांच्या आपसातील आणि इंग्रज यांच्याशी झालेल्या मराठयांच्या लढायामुळे सर्व सामान्य जनता त्रासून गेली होती. त्यात निसर्गाच्या अवकृपेची भर पडून इ.स. 1803 मध्ये भंयकर दुष्काळ पडला. अशा भयानक परिस्थितीत रखवालदार म्हणून रक्षणाचे काम करणारे भिल्ल द–या खो–यातून लूट मार करत होते. जमिनदारांनी रखवालीस ठेवलेले अरब जीव घेणी सावकारी करु लागले. त्यात भर म्हणजे जमा बंदी वसूल करणारे सरकारी अधिकारी छळ करु लागले. अशा परिस्थितीत प्रजेला कोणी वाली उरला नव्हता. म्हणून या सर्व जाचाला कंटाळून इ.स. 1803 साली धुळे गांव अगदी ओस पडले होते.

इ.स. 1804 मध्ये सरदार विंचूरकर यांच्या अधिपत्याखाली हा प्रदेश देण्यात आल्यावर त्यांनी बाळाजी बळवंत या नावाच्या आपल्या अधिका–यावर या भागात पाठविले. त्यांनी धुळे गांव पुन्हा वसविले. त्यावेळी त्यांनी देवपुरातील गढी आणि जुने गावातील गणेश पेठ म्हणून ओळखली जाणरी पेठ दुरुस्त केली. सोनगीरपासून लळींग पर्यंतचा भाग त्याच्या देखरेखीखली असल्याने या भागावर देखरेख ठेवण्यास धुळे गाव योग्य असल्याने त्यांनी धुळे गाव आपले मुख्य ठिकाण केले. इ.स. 1818 पर्यंत हा भाग मराठयांचाच देखरेखेखाली होता.

इ.स. 1818 सालात मराठयांचा पूर्ण पराभव करुन इग्रजांनी मरांठयांचे संपूर्ण राज्य ताब्यात घेतल्यावर खान्देशच्या भागावर देखरेख ठेवण्याच्या कामावर कॅप्टन जॉन ब्रिग्ज या अंमलदाराची नेमणूक करण्यात आली. त्यावेळी जुने धुळे देवपूर आणि मोगलाई असे तीनच भाग होते. नवे धुळे ;पेठद्ध मागावून वसविण्यात आले.धुळे सारखी वर्धाची रचना त्यावेळी असलेले आर्कीटेक्चर सर विश्वेशरैया याने धुळे शहराची रचना केली.

**Title: "***कॅप्टन जॉन ब्रिग्ज आणि धुळयाचा विकास* **" ,**
**Source: Review of Research [2249-894X]** *एन. एस. पाटील* **yr:2014 | vol:3 | iss:10**

कॅप्टन जॉन ब्रिग्ज याचे देखरेखीखाली हा भाग आल्यावर त्याने आपली फौज हल्ली रजिस्ट्रार कचेरी म्हणून ओळखल्या जाणा–या कचेरी भोवती सिव्हील हॉस्पीटल, स्वार लाईन, भिलखोर लाईन, सिटी हायस्कूल मागील पटांगण या मोठया भागात ठेवली व हल्ली रजिस्ट्रार कचेरी म्हणून ओळखली जाणारे ऑफीस ही त्यांची मुख्य कचेरी होती. ब्रिटीश आमदानातील धुळयातील पहिली सरकारी इमारत हीच असावी. खान्देश भांगात सर्वत्र स्थिरस्थावर झाल्यावर या भागावर देखरेख ठेवण्यास धुळे गांव योग्य आहे असे पाहुन त्यांनी धुळे गांवाची वाढ करण्याचे ठरविले. हल्ली पेठ म्हणून संबोधल्या जाणा–या धुळे गांवाची रचना केली. व या भागात राहण्यासाठी ब–हाणपूर, सुरत मुंबई येथून व्यापारी व कारागीर यांना बोलावून त्यांना मोफत जागा देण्यात आल्या कित्येकांना बिनव्याजी रक्कमा, कित्येकांना घरे, कित्येकांना अल्पकिंमतीत घरे, कित्येकांना अल्पकिंमतीत जागा देण्यात आल्या.

खान्देशचा प्रदेश सुपीक, दुध दुभते भरपूर आणि कापसाकरिता प्रसिध्द तापी, पांझरा व गिरणा या तीन नद्यांतील खो–यात वसलेला आणि धनधान्याने वसलेल्या या प्रदेशात आणि तिन्ही नद्यांच्या मध्यभागी वसलेले धुळे गांव सर्व सोईनी चांगले असलेले पाहून दिवसें दिवस त्याची वाढ होत राहिली ब्रिग्ज साहेबांनी धुळे शहराची रचना केली रचनेच्या बाबतीत या गावांचा नंबर बराच वर लागतो. या नवीन वस्ती झालेल्या भागात खोल गल्लीच्या उत्तर पश्चीम कोप–यावर असलेल्या घरात न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे धुळे येथे न्यायमूर्ती असतांना वास्तव्य करीत होते. बाजूलाच भट स्मृती मध्ये इतिहासाचार्य वि.का.राजवाडे हे आपल्या मित्राकडे वास्तव्याला होते.

उत्तर हिंन्दुस्थानातील मोमिन लोकांचे लक्ष या भागाकडे लागले. पूर्वी भागात पोसाडया आणि पागोटी तयार करणारेच लोक होते. उत्तर हिंन्दुस्थानातील मोमिन लोक येवू लागल्यावर त्यांनी धुळे येथे हातमाग घालून इतर कापड काढण्यास सुरुवात केली. मुंबईच्या मोठमोठया धनिकांच्या पैशाचा ओघ धुळयाकडे वाहू लागला. इतकेच नव्हे तर परदेशी कंपन्याही धुळे गावांत आपले कापसाचे कारखाने काढू लागले. धुळे गावातील होणारी कारखान्याची लोकसंख्येची आणि व्यापाराची वाढ पाहून व धुळे शहराच्या आसपासच्या समृद्ध भाग पाहून ग्रेट इंडियन पेनिनशुला रेल्वेने ;हल्लीची सेंट्रल रेल्वेद्ध दिनांक 15.10.1900 साली चाळीसगांव ते धुळे असा रेल्वे फाटा सुरु केला. धुळयास कॉटन प्रेस सुरु झाले. तेलाच्या गिरण्या सुरु झाल्या आणि इतर धंदेही वाढीस लागले. परंतु या गावात कापडाची गिरणी नव्हती अमळनेरचे दानशूर श्री प्रताप शेटजी यांनी दिनांक 24.12.1923 रोजी न्यू प्रताप स्पिनिंग ॲन्ड विव्हींग मील सुरु करुन ही उणीव भरुन काढली.

दिनांक 15.09.1872 रोजी पांझरा नदीने राक्षसी अवतार धारण करुन तिच्या काठाशी असलेली शेती, घरे जमिन दोस्त केली. या महापूराने जनतेचे अतोनात नुकसान झाले. धुळे गावाचे तर फारच नुकसान झाले. देवपूरात असलेली गढी संपूर्ण वाहून गेली. आग्रारोडच्या पुलाच्या पश्चिम बाजूस असलेले विठोबांचे मंदिर संपूर्ण वाहून गेले. यानंतर पुन्हा 17.08.1944 साली पांझरा नदीने अकाळविकाळ रुप धारण केले होते. त्यावेळी देवपूरात नदी काठी असलेली मोची वैगेरे लोकांची सर्व घरे वाहून गेली या महापूराच्या वेळी पांझरा नदीवरील पूलावर 3–4 फूट पाणी आले होते.

1 सप्टेंबर 1895 महमंद पैगंबराचा दिवस होता आणि त्याच दिवशी जुने धुळयातील खाबेटे मास्तरांच्या गणपतीचा विसर्जन समारंभ होता. गणपतीची मिरवणूक मुल्लाचे मशिदीवरुन मिरवत जाणार होती. ती मशीदीवरुन वाजत गाजत न जाता शांतपणे जावे असे मुसलमानांचे म्हणणे होते. या भांडणाचे रुपांतर शेवटी दंग्यात झाले. सरकारला गोळीबार करावा लागला. बरीच लोक जखमी झाली. जाळपोळ, लुटालुट झाली त्या दिवसापासुन जुने धुळयातील मुल्लाचे मशीदीचे खुनी मशीद हे नाव रुढझाले.

इ.स. 1827 साली प्राथमिक शाळा आता असलेल्या एक नंबर शाळेत काढण्यात आली. दिनांक 12.12.1864 साली मुलीं करता शाळा नंबर सहा मध्ये सुरु करण्यात आली. इ.स. 1864 मध्ये धुळे शहरात उर्दू शिक्षणाची सोय करण्यात आली. 11 ऑक्टोंबर 1853 विजया दशमी शके 1775 या मुहर्तावर इंग्रजी शाळेचे रुपांतर गरुड हायस्कूल धुळे या संस्थेत झाले. त्यावेळी 581 विद्यार्थी शिक्षण घेत होते.

धुळे येथील पांझरा नदीवरील दगडी पूल पूलाखालील कमानी हया जवळ 29 आहेत. कॅप्टन जॉन ब्रिग्जने 1818 मध्ये भिल्लांचा बंदोबस्त केला. कॅप्टन जॉन ब्रिग्ज यांची खान्देशचा कलेक्टर आणि पॉलीटीकल एजंट म्हणून नेमणूक झाली त्याने कुकरमुडा येथे स्थनिक लोकांचे बंड मोडून काढले कॅप्टन जॉन ब्रिग्ज या अधिका–याने स्थनिक नेत्याला ठार केले. आणि नियंत्रण प्रस्थापीत केले. इंग्रजांची एक लहान तुकडी कुकंरमुडा येथे ठेवण्यात आली होती.

***संदर्भ साधने :–***

1.निबंध संग्रह 2 खान्देश इतिहास परिषद संपादक (डॉ.प्र.न.देशपांडे प्रकाशक पान. नं. 22,23)
2.धुळे नगरपालिका शसावत्सरी महोत्सव ग्रंथ 1962 संकलन गो.वा. जोग पान. न. 2 ते 9
3.धुळे जिल्हा कॉग्रेंसशताब्दी महोत्सव स्मरणिका शहा जी.बी. / शहा त्रि.ग. हिंन्दुस्थानच्या स्वातंत्र चळवळीत धुळे जिल्हयाचे योगदान सन. 1985 पा.313
4.धुळे जिल्हयाचे गॅझेटीयर आवृत्ती 1880 पा.न.825
5.महाराष्ट्राचे जिल्हे (धुळे) आवृत्ती 1960प्रसिद्धी विभाग महाराष्ट्र सरकार मुंबई पा. 3.



***एन. एस. पाटील***
विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.net